**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०३**

मी शपथेवर सत्यकथन करतो की,

माझे नाव — भास्कर राजाराम गायकवाड,

वय:– ५५ वर्षे, धंदा:–शेती,

राहणार:– जातेगाव, जामखेड ता. जामखेड, जि. अहमदनगर

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांचा उलटतपास प्रतिवादींचे सुविद्य विधिज्ञ श्री. जे. एम. कोल्हे यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

**०१.** माझे शिक्षण इयत्ता १०वी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक ०२ मधुकर हा मागील २० वर्षांपासून अहमदनगर येथे वास्तव्यास आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक ०२ हा आजतागायत अहमदनगर येथेच वास्तव्यास आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, तो गावी येत असतो. दावा मिळकतीचा गट क्रमांक ६८३ असून मला त्याचे संपूर्ण क्षेत्र सांगात येईल. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, गट क्रमांक ६८३ चे एकूण क्षेत्र १८१ आर इतके आहे. मला गट क्रमांक २८३ च्या चतु:सिमा सांगता येतील. दावा मिळकत गट क्रमांक ६८३ चे पूर्वेला रस्ता, पश्चिमेला गट क्रमांक ६७९, दक्षिणेला रस्ता व उत्तरेला गट क्रमांक ६८४, ६८५ व ६८६ च्या मिळकती आहेत.

**०२.** जमीनीच्या व्यवहारामध्ये भिकाजी रघुनाथ गायकवाड पाटील, त्रिंबक महादेव गायकवाड व माझे भाऊ प्रतिवादी क्रमांक ०२ हे होते. सदर जमीनीचा व्यवहार हा फक्त ३५ गुंठे क्षेत्राकरीता ठरला होता. हे म्हणणे खरे आहे की, ६ गुंठे पोटखराब क्षेत्राचा व्यवहार ठरला नव्हता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्यावेळी सदरचे ६ गुंठे क्षेत्र हे "गोलक" होते. मी सदरच्या व्यवहाराच्या रक्कमेपैकी रक्कम रुपये ५००/– हे मी इसार म्हणून प्रतिवादी क्रमांक ०१ यांस गावी दिले व उर्वरित रक्कम रुपये १०,०००/– ही खरेदीखताच्या दिवशी दिली.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखत करतेवेळी माझे भाऊ वादी क्रमांक ०२ हे

उपस्थित नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखताचे दिवशी मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मी खरेदीखत करतेवेळी हजर होतो हे दर्शविणारा माझ्या तोंडी जबाबाव्यतिरीक्त कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखत करतेवेळी मी ओळखदेणार म्हणून किंवा साक्षीदार म्हणून सदर खरेदीखतावर सही केलेली नाही. सदरचे खरेदीखत हे ३५ गुंठे क्षेत्रासाठी केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ६ गुंठे पोटखराबाचे खरेदीखत आम्ही केलेले नाही.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखत नोंदविण्याच्या पूर्वी त्या जमीनीच्या अनुशंगाने आम्ही जाहीर नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखत नोंदविण्यापूर्वी त्या क्षेत्राची सरकारी मोजणी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ६८३ चा खरेदीखत करण्यापूर्वी ७/१२ उतारा मी पाहिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ६८३ चे ७/१२ उताऱ्यावर शंकर व्यतीरिक्त सह हिस्सेदार म्हणून दुसऱ्या कोणाचेही नाव नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी गट क्रमांक ६८३ मधील ७/१२ उताऱ्यावर ओमकार रामकृष्ण गायकवाड याचे सहहिस्सेदार म्हणून नाव होते.

**०५.** गट क्रमांक ६८३ मधील क्षेत्र खरेदी करण्यापूर्वी त्या क्षेत्रावर कोणीही कर्ज घेतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत करतेवेळी गट क्रमांक ६८३ वर जातेगाव बँक ऑफ महाराष्ट्राचा रक्कम रुपये ५,०००/– चा बोजा होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रात नमुद केलेला मजकूर म्हणजेच "प्रतिवादी क्रमांक ०१ यांनी आम्हास ०हे ३५ आर अधिक पो.ख. ०–०६ आर असे एकूण ० हे ४१ आर क्षेत्र विक्री करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे मी आपसात बैठकीत ठरलेप्रमाणे रक्कम रुपये १०,५००/– रोख प्रतिवादी क्रमांक ०१ शंकर गायकवाड यांना दिले " खोटा आहे.

**०६.** सदरचे खरेदीखत कोणी लिहिले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे खरेदीखत मी प्रत्यक्षात स्वत: वाचलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे खरेदीखत खर्डा येथे झाले आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदरचे खरेदीखत हे जामखेड येथे झाले आहे. गट क्रमांक ६८३ मधील सहहिस्सेदार ओमकार गायकवाड व शंकर गायकवाड यांचेमध्ये

दिशा दाखवून वाटप झाले किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. सदरचे खरेदीखत हे ओमकार गायकवाड हा अज्ञात असल्याने त्याच्या अ.पा.क.आई यांच्या संमतीविना सदरचे खरेदीखत केलेले आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

**०७.** सदर खरेदीखतान्वे जमीनीचा ताबा हा दिनांक ०१/०५/१९९४ देण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमीनीचा ताबा घेण्यापूर्वी त्याची लेखी ताबा पावती आम्ही लिहून घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला मधुकर यांनी सदर जमीनीचा ताबा दिलेला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, ३५ आर क्षेत्राची ७/१२ उताऱ्यावर नोंद झाली.

**०८.** हे म्हणणे खरे नाही की, आमचे गट क्रमांक ६८३ मधील ३५ आर इतक्या क्षेत्राचे खरेदीखत झाले असूनही आम्ही तलाठी यांच्याशी संगणमत करुन गट क्रमांक ६८३ चे ७/१२ उताऱ्यावर ०.४१ आर इतक्या क्षेत्राची नोंद करुन घेतली. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही गट क्रमांक २८३ चे ७/१२ उताऱ्यावरील जास्तीचे ६ आर क्षेत्र कमी करण्यासाठी तलाठी यांचेकडे कोणताही अर्ज दिलेला नाही.

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक ०२ मधुकर यांचे नावावर गट क्रमांक ६८३ मधील ४१ आर इतके क्षेत्र असल्याने त्याचे खरेदीखत वादी क्रमांक ०१ निलेश यांना करुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखताचे वेळी मी उपस्थित नव्हतो. वादी क्रमांक ०२ मधुकर यांनी वादी क्रमांक ०१ निलेश यांना करुन दिलेल्या खरेदीखतामध्ये खरेदी घेतलेल्या क्षेत्राच्या दिशा दर्शविलेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक ०२ मधुकर यांनी वादी क्रमांक ०१ निलेश यांना करुन दिलेले खरेदीखत मी वाचलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे खरेदीखत हे गट क्रमांक ६८३ मधील ४१ आर च्या ज्या चतु:सिमा होत्या त्याच चतु:सिमेचे खरेदीखत करुन दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्रमांक ०२ मधुकर यांनी वादी क्रमांक ०१ निलेश यांना करुन दिलेले खरेदीखतामध्ये दिशा दर्शविलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक ०१ निलेश चे नावावर करुन दिलेल्या खरेदीखताची नोंद ७/१२ उताऱ्यावर आजतागायत झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची जमीन वादी क्रमांक ०१ निलेश याचे ताब्यात नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरची जमीन वादी क्रमांक ०२ मधुकर यांचे

देखील ताब्यात नाही.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, वादी क्रमांक ०१ व ०२ यांचेमध्ये गट क्रमांक ६८३ मधील ३५ आर क्षेत्राचा झालेला व्यवहार हा "परत तोंडी सोडविण्याच्या अटीवर" झालेला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखताच्या पोटी त्याची रक्कम ही उसणवार रक्कमेच्या पोटी दिली होती. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदरचा व्यवहार हा रोख स्वरुपात झालेला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे खरेदीखत हे ताबा न देता झालेले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्रमांक ०२ मधुकर यांनी त्रिंबक मारुती गायकवाड व मारुती यांचे समक्ष मला चैत्र शुध्द पाडव्याला रक्कम रुपये १०,०००/– दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्रमांक ०२ मधुकर यांचेकडून रक्कम रुपये १०,०००/– घेवून त्यानंतर गट क्रमांक ६८३ मधील जमीन ही वादी क्रमांक ०१ निलेश यांना दिनांक २४/०६/२०१६ रोजी बेकायदेशिररीत्या विक्री केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे मालकीचे ६ आर क्षेत्र नसतांना देखील मी वादी क्रमांक ०१ निलेश यांस सदर क्षेत्राचे खरेदीखत करुन दिले. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक ०१ यांस खरेदीखत करुन देते वेळी गट क्रमांक ६८३ च्या ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कामध्ये जातेगाव बँक ऑफ महाराष्ट्राचा रक्कम रुपये ५,०००/– चा बोजा होता.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादी क्रमांक ०१ शंकर यांना आडविल्यामुळे त्यांनी माझ्याविरुध्द पोलीस ठाणे येथे बऱ्याच तक्रारी केलेल्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रमांक ०१ शंकर यांनी गट क्रमांक ६८३ मधील जमीनीची सुधारणा केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी गट क्रमांक ६८३ मध्ये प्रतिवादी क्रमांक ०१ शंकर याचे क्षेत्र आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, गट क्रमांक ६८३ मध्ये प्रतिवादी क्रमांक ०१ यांचे नातू ओंकार यांचे नावावर आहे. साक्षीदार स्वत:हून पुन्हा सांगतो की, ओंकार हा लहान असल्याने सदरच्या क्षेत्राची वहिवाट प्रतिवादी क्रमांक ०१ शंकर हेच करतात.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रात नमुद केलेला मजकूर म्हणजेच “प्रतिवादी क्रमांक ०१ व त्याचे कुटूंबिय आम्ही खरेदीखत घेतले पासून म्हणजे गेले ३० वर्षांत कधीही जमीनीत आलेले नाहीत.” हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मा. न्यायालयात

कसा जबाब दयायचा याचे बाबत मी माझे भाऊ मधुकर यांना विचारना केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मधुकर यांचे सांगण्यावरुन प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार म्हणून खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी मा. न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण,**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

सही/

**(अनुश्री ब. फंड)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांकः– १९/०७/२०२५
ठिकाणः– जामखेड

(साक्षीदाराचा जबाब त्याने सांगितल्याप्रमाणे नोंदविला)